मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१

## कृषि तंत्रज्ञान पार्कसाठी कृषि विद्यापीठास मिळणार भरीव निधी
## कृषि विद्यापीठात वनमहोत्सव उत्साहात संपन्न









**दि. ७ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार या क्षेत्रामध्ये कार्य फार मोठे आहे. या विद्यापीठास कृषि तंत्रज्ञान पार्कसाठी भरीव निधी देण्यासाठी सर्व प्रयत्न करु असे प्रतिपादन ग्रामविकास व कामगार मंत्री आणि अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. हसन मुश्रीफ यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या वनमहोत्सव सांगता समारंभात केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात दि. १ ते ७ जुलै, २०२१ या कालावधीत वनमहोत्सव सप्ताह साजरा झाला. या पार्श्वभूमीवर आज अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आणि ग्रामविकास मंत्री ना. श्री. हसन मुश्रीफ आणि आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री श्री. पोपटराव पवार यांच्या हस्ते वृक्षारोपन करुन वनमहोत्सव सप्ताहाचा सांगता समारंभ उत्साहात संपन्न झाला.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१

पद्मश्री श्री. पोपटराव पवार यांनी बिगरगाभा पाणलोट क्षेत्र विकासासाठी विद्यापीठाच्या पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाला रु. २८ लाखाच्या निधीचे पत्र कुलगुरुंना सुपूर्त केले. ते म्हणाले विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांमध्ये प्रत्येक जिल्ह्यात पाणलोट क्षेत्र विकासासाठी आदर्शगाव योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करु असे आश्वासन दिले. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले व विद्यापीठाच्या संशोधन, शिक्षण आणि विस्तारासंदर्भात माहिती दिली. यावेळी अहमदनगरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, पोलिस अधिक्षक श्री. मनोज पाटील, उपवनसंरक्षक श्रीमती सुवर्णा माने, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. दिपक पाटील, अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. महानंद माने, नियंत्रक श्री. विजय कोते, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. दिलीप पवार, डॉ. श्रीमंत रणपिसे आणि डॉ. मिलिंद अहिरे यावेळी उपस्थित होते. यावेळी मध्यवर्ती परिसरातील सर्व विभाग प्रमुख, प्रकल्प प्रमुख यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांचे मार्फत आपआपल्या विभागातील प्रक्षेत्रावर वृक्षारोपन केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या दहा जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व संशोधन केंद्रे, कृषि महाविद्यालयात या वनमहोत्सव सप्ताहानिमित्त ७५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. कोव्हीड–१९ च्या पार्श्वभूमीवर शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सोशल डिस्टसिंग, सॅनिटायझेशन व मास्कचा वापर करुन या सर्व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या को ८६०३२ ऊस वाणाची यशोगाथा







**दि. २६ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव या संशोधन केंद्राने सन १९९६ साली उसाची को ८६०३२ ही जात महाराष्ट्रामध्ये तिन्ही हंगामासाठी लागवडीकरिता शिफारस केलेली आहे. या उसाच्या वाणास या वर्षी २५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. या सुवर्ण महोत्सवी वर्षात दुग्धशर्करायोग्य म्हणून मौजे चोराडी, ता. खटाव, जि. सातारा येथील श्री. बापू आण्णा पिसाळ या शेतकऱ्याने विद्यापीठाने प्रसारित केलेल्या ऊस वाण को ८६०३२ लागवडीमधून त्यांची आर्थिक परिस्थिती उत्तम झाली असल्याने आलेल्या उत्पन्नातून ११०० चौरस फुट बंगला बांधलेला आहे. या ऊस वाण लागवडीमुळे उत्तम प्रपंच करूनही त्यांची आर्थिक दरी उंचावल्याने त्यांनी ज्यामुळे हे घडू शकले त्या कारणाने त्यांनी त्यांच्या या नवीन बंगल्याला ८६०३२ ची कृपा हे नाव देऊन बंगल्यावर या वाणाचे उसाचे पेंटिंग केलेले आहे. सदर वाण हे पाडेगाव संशोधन केंद्राने शिफारस केल्यामुळे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व ऊस संशोधन

केंद्रातील शात्रज्ञांना त्यांचा अभिमान आहे. त्याचबरोबर त्यांनी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील व संचालक डॉ. शरद गडाख, डॉ. अशोक फरांदे यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. अशा शेतकऱ्याचा आदर सन्मान करावा व त्यांची भेट व मुलाखत घेणेसाठी मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर व त्यांच्या समवेत या केंद्रातील शास्त्रज्ञ सर्वश्री डॉ. गारकर, डॉ. घोडके, डॉ. उबाळे, डॉ. सौ. शेळके, डॉ. थोरवे या शास्त्रज्ञांच्या व शेतकरी बांधवांसमवेत श्री. बापू कृष्णा पिसाळ यांना फेटा, श्रीफळ, ऊस मार्गदर्शन पुस्तिका व महात्मा फुले कृषि विद्यापीठाची कृषि दैनंदिनी देऊन सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या मुलाखतीनंतर एकरी १०० टन व त्याहुन अधिक उत्पादन कसे घेता येईल त्याचबरोबर उत्तम खोडवा व्यस्थापन, पाचट कुट्टी करून कुजवणे, ऊस बेणेमळा याबाबत डॉ. रासकर यांनी मार्गदर्शन केले.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे शुभहस्ते अनुकंपा तत्वावर नियुक्ती आदेश प्रदान



**दि. २९ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात विद्यापीठ सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या ९ वारसांना अनुकंपा तत्वावर कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांचे शुभहस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले. सदर दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसास अनुकंपा तत्वावर नियुक्ती आदेश देणे गरजेचे असतांना आदेश निर्गमीत करावयाची प्रक्रिया तांत्रिक बाबींचा आडोसा घेत जवळपास एक वर्षापासुन रखडवून संबंधीत वारसांना नियुक्ती आदेश मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आलेले होते. परंतु, कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या कर्तव्य दक्षतेने व गतिमान प्रशासनाच्या संकल्पनेतुन सदर नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात आली. अनुकंपा तत्वावर निर्गमीत करण्यात आलेल्या नियुक्ती आदेशातील ८ कर्मचाऱ्यांना वर्ग–४ संवर्गात व १ कर्मचाऱ्यास वर्ग–३ संवर्गात नियुक्ती देण्यात आली. या कामी कुलसचिव व त्यांचे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे सहाय्य झाले.विद्यापीठात आयोजित या छोटेखानी कार्यक्रमात कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या शुभहस्ते नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. याप्रसंगी अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, तत्कालीन कुलसचिव डॉ. महानंद माने आणि नियंत्रक श्री. विजय कोते उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषद सदस्यांची धुळे कृषी महाविद्यालयास भेट






**दि. ३१ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सन्माननीय सदस्य व आमदार विधान परिषद मा. श्री. नरेंद्रजी दराडे, तसेच मा. डॉ. पंकजकुमार महाले यांनी कृषि महाविद्यालय, धुळे तसेच महाविद्यालयातील डेअरी विभाग आणि उद्यानविद्या विभागास कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर यांच्या उपस्थितीत भेट देऊन विविध प्रकल्पांची पाहणी केली. यावेळी डॉ. चिंतामणी देवकर यांनी उभयतांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले तसेच कृषि महाविद्यालयातील उपलब्धी आणि उपक्रमांबाबत माहिती विशद केली. आपल्या भेटी दरम्यान मान्यवरांनी महाविद्यालयातील डेअरी विभागात लाल सिंधी गाय, आय.आर.सी.टी. प्रकल्प, गांडूळ खत प्रकल्प तसेच उद्यानविद्या विभागातील रोपवाटिका, ग्रीन हाऊस व रोपांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यावेळी आर्थिक नियोजन, भविष्यातील नियोजन तसेच विविध बाबींबाबत बैठक पार पडली. डेअरी विभागातील भेटीचे नियोजन डॉ. संदीप पोळ आणि डॉ. विपुल वसावे यांनी तर उद्यानविद्या विभागातील भेटीचे नियोजन डॉ. सुनील पाटील आणि डॉ. रवींद्र पाटील यांनी केले होते. यावेळी कृषि महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संदीप पाटील यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. संदीप निकम यांनी केले.


# मफुकृवि ई वार्ता

जुलै २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१


## सुदूर संवेदन आणि भौगोलिक माहिती प्रणालीवर आधारित गुगल अर्थ इंजिन प्रणालीचा वापर





**दि. ५ जुलै, २०२१.** सुदूर संवेदन आणि भौगोलिक माहिती प्रणालीचा उपयोग पर्जन्य, जमिनीचा प्रकार, पाण्याची उपलब्धता आणि पीक पद्धतीच्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी महत्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे पीक विम्याच्या दाव्यामध्ये शासनस्तरावर निर्णय घेण्यासाठी सदर प्रणालीचा महत्वाचा वाटा आहे. त्यामुळे गुगल अर्थ इंजिन व सुदूर संवेदन आणि भौगोलिक माहिती प्रणालीमध्ये भविष्यामध्ये भरपूर रोजगार उपलब्ध  होतील असे प्रतिपादन देहरादुन येथील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ रिमोट सेसिंगचे संचालक डॉ. प्रकाश चौहान यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ येथील जागतिक बँक अर्थसहाय्यित राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि व तंत्रज्ञान केंद्रामार्फत, हवामान अद्ययावत शेतीसाठी पायथॉनसह गुगल अर्थ इंजिन प्रणालीचा वापर या विषयावर २१ दिवसीय ऑनलाईन प्रमाणपत्र कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संचालक प्रकाश चौहान बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी भूषविले. या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री, भारत सरकार यांचे खाजगी सचिव डॉ. अमोल शिंदे होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार तसेच इतर कृषी महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख उपस्थित होते.

या प्रसंगी डॉ. अमोल शिंदे यांनी सांगितले कि सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी या २१ दिवसात आत्मसात केलेल्या तंत्रज्ञानावर आधारित शोधनिबंध लिहावेत तसेच पंतप्रधान कार्यालय, भारत सरकार येथे आपला अभिप्राय नोंदवावा, जेणेकरून तिथल्या मान्यवरांना कृषि व शेतकरी विकासाची धोरणे आखण्यासाठी मदत होईल. या प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील गोरंटीवार यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठात सुरु असलेल्या सुदूर संवेदन आणि भौगोलिक माहिती प्रणालीचा अभ्यासक्रम, संशोधन व उपलब्ध असलेल्या उपकरणे व प्रयोगशाळेची माहिती दिली. डॉ. मुकुंद शिंदे यांनी पाहुण्यांचे स्वागत तसेच ओळख करून दिली. या प्रमाणपत्र कार्यक्रमामध्ये देशविदेशातून ११४ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. अभ्यासक्रम संचालक डॉ. अतुल अत्रे यांनी याची माहिती दिली.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि क्षेत्रातील उद्योजकतावरील वेबिनारचे आयोजन




**दि. २ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र आणि माजी विद्यार्थी संघटना, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि क्षेत्रातील विद्यार्थ्यांची उद्योजगता व रोजगारक्षमता विकसीत करणे या विषयावरील वेबिनार मालिकेचे उद्‌घाटन झाले. वेबिनार मालिकेतील पहिला ट्रॅक्टर उद्योगातील विद्यार्थ्याची उद्योजगता आणि रोजगार क्षमता विकसीत करणे या विषयावर पहिला वेबिनार संपन्न झाला. अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. या वेबिनारचे प्रमुख पाहुणे म्हणुन नवी दिल्ली येथील राष्ट्रीय संचालक (आयसीएआर–एनएएचईपी) आणि उपमहासंचालक (कृषि शिक्षण) डॉ. राकेशचंद्र अग्रवाल, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. सुर्यवंशी, डॉ. व्ही. एम. साळोखे उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की भारताच्या प्रचंड वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येला अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी उद्योजक विकासामध्ये वाढ होण्याची गरज आहे. त्यांनी उद्योगांमध्ये प्रामुख्याने खते, वेगवेगळी रसायने, कृषि प्रक्रिया उद्योग तसेच कृषि यांत्रिकरण उद्योगाचे महत्व विषद केले. यावेळी डॉ. अग्रवाल म्हणाले की कृषि विद्यापीठांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांशी करार करुन इंटर्नशिप बरोबर विद्यार्थ्यांना वेतन आणि रोजगार उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. त्याचबरोबर त्यांनी इन्क्युबेशन केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योजगता व रोजगार निर्मितीवर भर देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. कार्यक्रमाचे सहनिमंत्रक डॉ. मुकुंद शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सहा आयोजक सचिव श्री. भारत घोलप यांनी वक्त्यांची ओळख करुन दिली. विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. हरी मोरे यांनी वेबिनार मालिकेच्या उद्‌घाटन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. तसेच आयोजन सचिव डॉ. सचिन नलावडे यांनी सर्व मान्यवरांचे व वक्त्यांचे आभार प्रदर्शन केले. या वेबिनारसाठी १५० पेक्षा अधिक विद्यार्थी, शिक्षक व शास्त्रज्ञ यांनी सहभाग नोंदवला.

## शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाच्या माध्यमातून तंत्रज्ञान प्रसार वाढवणार




**दि. ९ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात ५४ शेतकरी–शास्त्रज्ञ मंच कार्यरत असून त्याचे सुमारे सतराशे शेतकरी सदस्य आहेत. मंचाच्या माध्यमातून तंत्रज्ञान प्रसाराचा वेग वाढविणार असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाचे ऑनलाईन खरीप पीक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. पाटील बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, सहयोगी संशोधन संचालक, मंचाचे समन्वयक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील पुढे म्हणाले की शेतकरी–शास्त्रज्ञ मंच ही विस्ताराची चांगली संकल्पना असून महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी एक चांगले माध्यम आहे. शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांचा चांगला समन्वय झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढण्यास निश्चित मदत होणार आहे.

विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य हे विद्यापीठाचे एक प्रकारचे राजदूत असून तंत्रज्ञान प्रसारासाठी त्यांचा सहभाग महत्त्वाचा आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व समन्वयकांनी शेतकऱ्यांना ऑनलाइन मार्गदर्शनाद्वारे त्यांच्या शेतीविषयक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावे. या प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. मिलिंद देशमुख यांनी सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान, डॉ. नंदकुमार कुटे यांनी तूर उत्पादन तंत्रज्ञान, डॉ. राजेंद्र वाघ यांनी कापूस लागवड तंत्रज्ञान आणि डॉ. विनायक जोशी यांनी खरीप कांदा उत्पादन तंत्रज्ञान या विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दहाही जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घेत आपले विचार मांडले. बैठकीचे प्रास्ताविक कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी केले तर आभार डॉ. सुनील अडांगळे यांनी मानले.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची आदर्शगाव हिवरेबाजारला भेट






**दि. ५ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी आदर्शगाव हिवरेबाजारला भेट दिली. महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गांव योजनेचे कार्याध्यक्ष आणि हिवरेबाजार गावचे सरपंच पद्मश्री श्री. पोपटराव पवार यांनी त्यांचे स्वागत आणि सत्कार केला. श्री. पोपटराव पवार यांना आदर्श गाव योजनेतून महात्मा फुले कृषि विद्यापीठाला विशेष बाब म्हणून पाणलोट क्षेत्र विकासासाठी १.१४ कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. या माध्यमातून संपूर्ण झालेल्या गाभा आणि स्वागतशील क्षेत्रातील कामांची चर्चा उभयतांनी यावेळी केली. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी उर्वरीत निधीमधून व्यवस्था करण्यासाठी ४६.५६ लाख रुपये मंजूर करण्याचे आश्वासन श्री. पोपटराव पवार यांनी दिले. या निधीद्वारे अद्ययावत व डिजीटल तंत्र आधारित पाणलोट क्षेत्र प्रशिक्षण केंद्र आणि वॉटरशेड पार्क उभारण्यासाठी श्री. पोपटराव पवार यांनी प्रोत्साहन दिले. श्री. पोपटराव पवार यांनी कुलगुरुंसमवेत हिवरेबाजार पाणलोट क्षेत्राची शिवारफेरी पुर्ण केली. या भेटीमध्ये श्री. पवार यांनी पाणलोट विकासाच्या संकल्पनेतून आदर्शगाव कसे निर्माण झाले याची सविस्तर माहिती दिली. तसेच भविष्याची दिशा तयार करुन यामध्ये विद्यापीठाद्वारे नविन तंत्रज्ञान विकसीत करण्याची गरज दर्शविण्यात आली. या प्रसंगी कुलगुरु डॉ. पाटील यांनी हिवरेबाजार पाणलोट क्षेत्राच्या डिजीटल नकाशाद्वारे संसाधनांची पडताळणी करण्यासाठी शास्त्रज्ञांना सुचना दिल्या. तसेच वातावरण बदलांचा यशस्वी सामना करण्यासाठी नाविन्यपूर्ण संशोधनात्मक कार्याची गरज विषद केली. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. श्री. पोपटराव पवार यांनी पाणलोट क्षेत्र विकासामध्ये कुलगुरुंनी विशेष लक्ष दाखविल्याबद्दल कौतुक करुन त्यांचे आभार मानले.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१
अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात कृषि दिन उत्साहात साजरा




**दि. १ जुलै, २०२१.** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने आयोजित कृषि दिन हा महात्मा फुले कृषि विद्यापीठात साजरा करण्यात आला. या प्रसंगी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. याप्रसंगी कृषि परिषदेचे महासंचालक श्री. विश्वजीत माने, स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक श्री. विनोद कुमार, अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. महानंद माने, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, नियंत्रक श्री. विजय कोते उपस्थित होते. यावेळी बोलताना कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले की कै. वसंतराव नाईक यांनी संकरित बियाणांना प्राधान्य देऊन राज्यात हरित क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना संकरित गायींच्या पैदाशीसाठी प्रोत्साहन दिले. ज्यामुळे महाराष्ट्रात पुढे श्वेतक्रांती झाली. महासंचालक श्री. माने यावेळी म्हणाले की कै. वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दित राज्यातील चारही कृषि विद्यापीठांची स्थापना झाली. आज कृषि क्षेत्रापुढे अनेक आव्हाने आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शेतकऱ्यांनी पीक उत्पादन आणि उत्पन्न वाढवावे असे प्रतिपादन डॉ. अशोक फरांदे यांनी केले. १ जुलै ते ७ जुलै, २०२१ या कालावधीमध्ये एकुण ७५ हजार झाडे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात लावण्याचे नियोजन आहे असे डॉ. शरद गडाख यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीसमोर वृक्षारोपण करण्यात आले.

वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संकेतस्थळाचे उद्‌घाटन






**दि. २८ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळाचे उद्‌घाटन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे शुभहस्ते संपन्न झाले. या प्रसंगी अधिष्ठाता डॉ. अशोक फरांदे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक श्री. विजय कोते व विद्यापीठातील सर्व मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार यांनी संकेतस्थळाच्या उपयुक्ततेविषयी माहिती देऊन संकेतस्थळाचा फायदा सर्व विद्यार्थी, पालक व शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होईल हे सांगितले. कुलगुरु डॉ. पाटील यांनी संकेतस्थळाच्या उद्देशाबाबत समाधान व्यक्त करुन संकेतस्थळाचा वापर सर्वांनी करणेबाबत सूचित केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संकेतस्थळ तयार करण्यासाठी डॉ. गोविंद येनगे व डॉ. अवधूत वाळुंज यांनी विशेष परिश्रम घेतले.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१

## कृषि विद्यापीठ कर्मचाऱ्यांकडून पूरग्रस्त भागासाठी मदत




**दि. ३० जुलै, २०२१.** राज्यात गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे व नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड या जिल्ह्यांचा समावेश आहे. सदर पूरग्रस्तांच्या मदतीसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या पुढाकारातून सर्व कर्मचाऱ्यांनी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देणार असल्याचे सांगितले. यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ कर्मचारी समन्वय संघाने सहकार्याची भुमिका घेऊन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या आव्हानाला सकारात्मक प्रतिसाद दिला. कर्मचाऱ्यांच्या एक दिवसाच्या वेतनाची रक्कम कृषि मंत्री ना. दादाजी भुसे यांचे मार्फत मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देणार असल्याचे कुलगुरु डॉ. पाटील यांनी सांगितले. यावेळी समन्वय संघाचे अध्यक्ष डॉ. चिंतामणी देवकर, उपाध्यक्ष डॉ. उत्तम कदम, डॉ. संजय कोळसे, श्री. मच्छिंद्र बाचकर, श्री. संजय ठाणगे, श्री. जनार्दन आव्हाड, श्री. गणेश मेहेत्रे, श्री. महेश घाडगे, श्री. बाबासाहेब अडसुरे उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१



## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांचे लसीकरण







**दि. १६ जुलै, २०२१.** कोव्हीडच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेनंतर तिसऱ्या लाटेची संभावना व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या प्रयत्नाने विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांसाठी कृषि विद्यापीठात लसीकरण केंद्र सुरु केले आहे. यासाठी कुलगुरुंनी अहमदनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांच्याशी चर्चा करुन विद्यापीठाची परिस्थिती मांडली. जिल्हाधिकाऱ्यांनी मागणी मान्य करुन कृषि विद्यापीठात विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांसाठी लसीकरण केंद्र सुरु करण्याची परवानगी दिली. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते लसीकरण केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी कुलगुरुंच्या हस्ते लसीकरण करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कुलगुरुंनी कोव्हीशील्ड या लसीचा सपत्नी दुसरा डोस घेतला. याप्रसंगी कुलसचिव डॉ. महानंद माने, सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, विद्यापीठ वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली हिले, प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. पंडित खर्डे, तांत्रिक अधिकारी डॉ. पवन कुलवाल उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१

## कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांद्वारे शेतकरी विकसित यंत्रे व अवजारांची पाहणी व मार्गदर्शन





**दि. ३० जुलै, २०२१.** देवरपाडा, मालेगाव, जि. नाशिक येथील प्रगतशील शेतकरी श्री. कमलेश घुमरे यांनी टाकाऊ आणि भंगार वस्तू पासून शेतकऱ्यांना उपयोगी असणारे व कष्ट कमी करणारे यंत्रे व अवजारांची निर्मिती केली आहे. श्री. कमलेश घुमरे यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि त्यांनी विकसित केलेल्या यंत्रे व अवजारांची पाहणी करण्यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठातील कृषि यंत्रे आणि शक्ती विभागाचे प्रमुख डॉ. सचिन नलावडे, कृषि अवजारे व यंत्र योजनेचे प्रमुख संशोधक डॉ. तुळशीदास बास्टेवाड आणि काष्टी, मालेगाव कृषि विज्ञान संकुलाचे प्रकल्प समन्वयक डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी श्री. कमलेश घुमरे यांच्या शेतात जाऊन त्यांनी तयार केलेल्या अवजारांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घेतली. त्यांच्या शंकांचे निरसन करुन त्या संबंधित तांत्रिक मार्गदर्शन केले. श्री. कमलेश घुमरे यांनी टाकाऊ वस्तूंपासून फवारणीसाठीची ढकलगाडी, शेवगा झेला, टोकन यंत्र आणि ट्रॅक्टरची केबिन तयार केली आहे. शेतकरी आपल्या शेतात विविध प्रकारचे प्रयोग करतात, त्यांना तांत्रिक मार्गदर्शन मिळाले तर त्यांचे संशोधन इतरांना उपयुक्त ठरेल. सर्वोत्तम शेतकरी तंत्रज्ञान विकसित होण्याच्या उद्देशाने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलिप पवार यांच्या पुढाकाराने कृषि अभियांत्रिकी विद्या शाखेने या वर्षापासून शेतकरी तंत्रज्ञान स्पर्धा आयोजित करण्याचा ठरावही संमत केला आहे. सदर स्पर्धा शेतकरी संशोधकांसाठी त्यांचे तंत्रज्ञान प्रदर्शित करण्याचे एक उत्तम व्यासपीठ ठरेल आणि काही सर्वोत्तम तंत्रज्ञानास पारितोषिकाबरोबरच सदर तंत्रज्ञानाचा विकास करून त्यांना उद्योजकता विकसित करणेसाठी कृषि विद्यापीठामार्फत मदत केली जाईल.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१

## बुचकेवाडी येथील प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न








**दि. १२ जुलै, २०२१.** जागतिक बँक अर्थ सहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे हवामान अद्ययावत शेती आणि जल व्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र सुरु करण्यात आले असून या प्रकल्पांतर्गत बुचकेवाडी, येथे कांदा व टोमॅटो पिकांवरील कीड–रोग व्यवस्थापन याविषयी एकदिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाकरिता तज्ञ म्हणून महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कापुस सुधार प्रकल्पाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. नंदकुमार भुते होते. याप्रसंगी बुचकेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. सुदामजी डेरे, उपसरपंच श्री. सुरेशजी गायकवाड, कृषि सहाय्यक श्री. अमोल मोरे व सर्व सदस्य, लुपिनचे श्री. बाळू बोरुडे तसेच संशोधन सहयोगी उपस्थित होते. डॉ. भुते म्हणाले एकात्मिक कीड व्यवस्थापन केल्यास किडींचे योग्य नियंत्रण होते, शेतकऱ्यांची आर्थिक बचत होवून पर्यावरणाचा समतोल राखला जातो. शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त एकात्मिक कीड व्यवस्थापन केल्यास खर्चात बचत होवून उत्पादनात वाढ होईल असे प्रतिपादन त्यांनी केले. डॉ. सेवक ढेंगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रशिक्षण संपल्यानंतर तज्ञांचे प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. एम.जी. शिंदे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. सचिन सदाफळ यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणात बुचकेवाडी येथील एकूण ३४ शेतकरी आणि कृषि महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील ग्रामीण कृषि कार्यानुभव करिता निवड झालेले ४ विद्यार्थी सहभागी झाले होते. सूत्रसंचालन डॉ. सेवक ढेंगे यांनी केले तर आभार डॉ. शुभांगी घाडगे यांनी मानले.

## हवामान अद्ययावत गांव मान्हेरे येथे आपत्कालीन पीक व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न





**दि. १४ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील जागतिक बँक अर्थ सहाय्यीत, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती आणि जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पांतर्गत मान्हेरे, ता. अकोले, जिल्हा. अहमदनगर येथे आपत्कालीन पीक व्यवस्थापन या विषयी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी मान्हेरे ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. हरीजी गभाले, उपसरपंच श्रीमती. मंदाबाई बिन्नर, मान्हेरे येथील तंटा मुक्त गाव समितीचे अध्यक्ष श्री. तुकारामजी गभाले, बायफचे समन्वयक श्री. रामनाथ नवले, कास्ट प्रकल्पातील संशोधन सहयोगी डॉ. स्नेहल कानडे, डॉ. वैभव मालुंजकर, डॉ. शुभांगी घाडगे, डॉ. सेवक ढेंगे आदी उपस्थित होते. या चर्चासत्रात आपत्कालीन पीक व्यवस्थापन, पिकांवरील कीड–रोग व्यवस्थापन व पिकवलेल्या मालाला योग्य बाजारभाव या विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. वैभव मालुंजकर, डॉ. स्नेहल कानडे आणि डॉ. शुभांगी घाडगे यांनी मार्गदर्शन केले. सहयोगी प्राध्यापक डॉ. रवी आंधळे, प्रकल्प समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार, प्रकल्प सहसमन्वयक डॉ. मुकुंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेकरिता दत्तक घेण्यात आलेल्या सात गावांतील एकूण ४३ शेतकरी उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
जुलै २०२१



## हवामान संरक्षित पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांकरिता कार्यशाळा संपन्न




**दि. २६ ते २८ जुलै, २०२१.** जागतिक बँक अर्थसहाय्यित राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत हवामान संरक्षित पाणलोट क्षेत्र विकास या विषयावर तीन दिवसीय ऑनलाईन कार्यशाळा महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास (नाबार्ड) बँक पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाली. या कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी पुणे येथील महाराष्ट्र प्रादेशिक कार्यालय, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक श्री. गोवर्धनसिंग रावत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या भाषणात बोलतांना त्यांनी हवामान बदलामुळे कृषि क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा उल्लेख केला व त्यासाठी नाबार्ड अंतर्गत करता येणाऱ्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. तसेच या कार्यशाळेच्या उद्‌घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी भूषविले. या कार्यशाळेसाठी एकूण ५५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. संयोजक म्हणून प्रकल्प प्रमुख डॉ. सुनिल गोरंटीवार व विभाग प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, सहसंयोजक म्हणून प्रकल्प सहप्रमुख डॉ. मुकुंद शिंदे व पुणे येथील नाबार्डचे सहाय्यक महाव्यवस्थापक इंजि. सचिन कांबळे, आयोजन सचिव म्हणून डॉ. अतुल अत्रे यांनी काम पहिले. कार्यशाळेचे नियोजन डॉ. वैभव मालुंजकर, डॉ. स्नेहल कानडे व इंजि. मोहसीन तांबोळी यांनी केले.

## धुळे कृषि महाविद्यालयात वनमहोत्सव संपन्न






**दि. ६ जुलै, २०२१.** धुळे कृषि महाविद्यालयात हरितक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त दिनांक १ ते ७ जुलै हा कालावधी वनमहोत्सव सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी कृषि महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन धुळे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अजीज शेख, धुळे वन विभागाचे जिल्हा वनसंरक्षण अधिकारी श्री. माणिक भोसले, धुळे महानगरपालिकेचे नगर रचनाकार श्री. महेंद्र परदेशी व सार्वजनिक आरोग्य अधिकारी श्री. चंद्रकांत जाधव हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविदयालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर होते.

यांप्रसंगी आपल्या मार्गदर्शनात श्री. अजीज शेख यांनी प्रदूषण कमी होण्याकरिता व निसर्गचक्र सुरळीत राहण्याकरिता वृक्ष लागवड महत्त्वाची असल्याचे नमूद केले. यावेळी श्री. माणिक भोसले यांनी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, स्व. वसंतराव नाईक यांच्या कार्याबद्दल उपस्थितांना माहिती देवून कृषि महाविद्यालयाने हाती घेतलेल्या वृक्षारोपण उपक्रमाचे कौतुक केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. चिंतामणी देवकर यांनी उपस्थितांना कृषि महाविद्यालयात चालू असलेल्या विविध उपक्रमांबद्दल आणि वृक्ष लागवडीबाबत माहिती दिली. यांप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बांबू, कडूनिंब, सीताफळ, जांभूळ, चिंच व औषधी वनस्पती या प्रजातीची एकूण ८०० रोपांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी कृषि महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. एस. पी. सोनवणे, डॉ. सुनिल भणगे, डॉ. सी. व्ही. पुजारी, डॉ. एम.एस. महाजन, डॉ. जी. बी. काबरे, डॉ. पांडुरंग शेंडगे, डॉ. पी.डी. सोनवणे, डॉ. खुशाल बराटे, डॉ. राहुल देसले, डॉ. टी. डी. पाटील, डॉ. डी. एच कंखरे, श्री. व्ही.टी. पाटील, डॉ. संदीप पाटील, डॉ. डी. आर. नांद्रे व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन डॉ. संदीप पाटील यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. संदीप निकम यांनी केले.

## आंबा फळबाग व्यवस्थापनाबाबत शेतकरी–शास्त्रज्ञ संवाद




**जुलै २०२१.** विभागीय विस्तार केंद्र, कृषि महाविद्यालय, पुणे आणि कृषि विभागाच्या संयुक्त विद्यमाने आंबा पीक व्यवस्थापनाबाबत शेतकरी–शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रम नुकताच ऑनलाईन पध्दतीने झाला. गोऱ्हे बु. जि. पुणे येथील बाळासाहेब पारगे यांच्या बागेतून या संवादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आंबा लागवड, मोहोर संरक्षण, कीड, रोग नियंत्रणाबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठातील तज्ञ डॉ. सतिश जाधव, डॉ. विकास भालेराव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये गोऱ्हे बु., डोणजे, खानापूर परिसरातील प्रयोगशील शेतकरी बाळासाहेब पारगे, सुशांत खिरीड, अरुण पारगे, किरण खिरीड, हनुमंत वाघ, गणपत मांढरे, हेमंत पारगे हे आंबा उत्पादक तसेच कृषि विभागातील अधिकारी सुनिल खैरनार, सपना ठाकुर, शिवाजी खटके, वैभव पवार, ललीता भोसले, राजश्री वरपे, नितीन ढमाळ आदी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सोमनाथ माने, डॉ. सुनिल जोगदंड व डॉ. रविंद्र कारंडे यांनी केले.

## कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांचा सिंहगड भागातील शेतकऱ्यांशी संवाद



**जुलै २०२१.** तंत्रज्ञान शेताच्या बांधावर या उपक्रमांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, कृषि महाविद्यालय, पुणे व कृषि विभागाच्या वतीने गोऱ्हे बु. ता. हवेली येथे आयोजीत केलेल्या शेतकरी मेळाव्यात शास्त्रज्ञ तसेच अधिकाऱ्यांनी सिंहगड भागातील आंबा तसेच फळबाग उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी कृषि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. सतीश जाधव, डॉ. विकास भालेराव यांनी प्रात्यक्षिकांसह फळबाग लागवड, कीड नियंत्रण, आंबा साठवण आदिंची माहिती दिली. गोऱ्हे बु. येथील बाळासाहेब पारगे यांच्या शेतातून प्रात्यक्षिकांसह शेतकऱ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी गोऱ्हे, डोणजे, खानापूर आदी गावातील आंबा उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. बाळासाहेब पारगे, सुशांत खिरीड, किरण खिरीड, गणपत मांढरे, हेमंत पारगे, नंदु गोळे आदी शेतकऱ्यांनी आंबा लागवड, मोहोर संरक्षण, आंब्यावरील कीड रोग, आंबा साठवण याविषयी समस्या मांडल्या. यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. सोमनाथ माने, डॉ. सुनिल जोगदंड, डॉ. रविंद्र कारंडे, उपविभागीय कृषि अधिकारी सुनिल खैरनार, हवेली तालुका कृषि अधिकारी इ. सहभागी झाले होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात जलनेती अभियानास सुरुवात






**दि. १३ ते १५ जुलै, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात योग विद्या गुरुकुल, नाशिक अंतर्गत योग विद्या धाम, मफुकृवि शाखा आणि पारस उद्योग समूह, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनानिमित्त जलनेती अभियानास सुरुवात झाली. यामध्ये नेती पात्र व मोफत प्रशिक्षणाचा समावेश होता. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात आले. अभियानाच्या प्रारंभी कुलसचिव डॉ. महानंद माने, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. दिलीप पवार, डॉ. मिलिंद अहिरे, मृदशास्त्र व रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. बापूसाहेब भाकरे आणि प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे प्रामुख्याने उपस्थित होते. सुरुवातीला योग प्रशिक्षक सुरेश शेडगे यांनी जलनेती अभियानाबद्दल माहिती दिली. योग प्रशिक्षक श्री. रवींद्र आंधळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर योग प्रशिक्षक डॉ. देवेंद्र वंजारे यांनी आभार मानले. यावेळी पारस उद्योग समूहातर्फे प्रत्येक कुटुंबाला जलनेती पात्र मोफत देण्यात आले. डॉ. वंजारे आणि श्री. यश अहिरे यांनी उपस्थितांना जलनेती क्रियेचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. यानंतर गट तयार करून योग प्रशिक्षकांनी उपस्थितांची जलनेती क्रिया त्यांच्या मार्गदर्शनाखाली करून घेतली. यावेळी महिला व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. योग अध्यापिका सौ. वैशाली अहिरे, योग शिक्षिका सौ. संगिता कर्जुले आणि सौ. कविता काकडे यांनी महिला व विद्यार्थीनींना जलनेती करण्याचे प्रात्याक्षिक दाखविले.

## ऑगस्ट महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी व नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (२५ प्रति हेक्टर) शेतात लावावे.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास इमिडाक्लोरोपीड १७.८ एस.एल.२.५ मिली ग्रॅम किंवा ॲसीफेट ७५ ग्रॅम एस. पी. १० ग्रॅम किंवा फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास ट्रायझोफॉस ४० इ. सी. २५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- कामगंध सापळ्यामध्ये सतत २–३ दिवस, ८–१० गुलाबी बोंड अळीचे पतंग दिसून आल्यास प्रोफेनोफॉस ५० ई. सी. प्रमाणे २० मिली किवा लम्वडा सायहॅलोथ्रीन ५ ई. सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पायरीक्लोस्ट्रोबीन २० डब्ल्यू. जी. १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास २ टक्के डायअमोनियम फॉस्फेट खताचे द्रावण १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळेस पिकावर फवारावे.

### ऊस

- आडसाली उसाच्या लागवडीची कामे १५ ऑगस्ट पर्यंत पूर्ण करावीत.
- लागवडीसाठी दोन सरीमधील अंतर मध्यम जमिनीत १०० सें व भारी जमिनीत १२० सें ठेवावे. पट्टा पध्दतीसाठी मध्यम जमिनीत ७५–१५० सें. व भारी जमिनीत ९०–१८० सें पट्टा पध्दतीचा अवलंब करावा.
- रोगग्रस्त किडग्रस्त शेतातील व खोडव्याचे बेणे लागणीस वापरू नये. ऊस बेणे मळयातीलच चांगले ऊस बेणे निवडून लागणीसाठी वापरावे.
- आडसाली लागण करताना को.८६०३२, को.एम.०२६५ व को. व्ही.एस.आय. ९८०५ या शिफारशीत जातींचा वापर करावा.
- ऊस बेणे लागण करण्यापूर्वी खवले कीड, पिठ्या ढेकूण, लोकरी मावा, पांढरी माशी या किडीच्या नियंत्रणासाठी ३०० मिली मॅलॅथिऑन ५० टक्के प्रवाही अथवा डायमेथोएट २६५ मिली ३० टक्के प्रवाही आणि १०० ग्रॅ बावीस्टीन (०.१ टक्के) १०० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १० मि निटे बुडवावे आणि तेच बेणे परत १०० लिटर पाण्यात १० किलो प्रति हेक्टरी ॲसेटोबॅक्टर डायॲझोट्रॉपिकस आणि १.२५ किलो स्फुरद विरघळविणारे जिवाणु प्रति हेक्टरी याप्रमाणे मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवून ठेवावे व नंतर लागणीसाठी वापरावे, त्यामुळे नत्राच्या मात्रेत ५०% व स्फुरदाच्या मात्रेत २५% इतकी बचत होते.
- वाळवी, खोडकिड व मुळे पोखरणारी अळीच्या बंदोबस्तासाठी क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही २.५ लिटर १००० लिटर पाण्यात मिसळून ऊस लागणीनंतर वापश्यावर सरीतून प्रति हेक्टरी ओतावे.
- ऊस लागणीकरीता उसाच्या एक डोळा अथवा दोन डोळा टिपरीचा वापर करावा.
- उसावरील पोक्का बोईंग या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ०.३० टक्के मॅन्कोझेब या बुरशीनाशकाच्या ३ फवारण्या १२ दिवसाच्या अंतराने कराव्यात.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :१, अंक क्रं. : ७, जुलै २०२१

### कडधान्य पिके

### मूग आणि उडिद

- फुलकळी लागण्याच्या आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत गरजेनुसार शिफारशीत किड व रोग नियंत्रणाचे उपाय करावेत. यासाठी मोनोक्रोटोफॉस ३६ टक्के एस एल ६२५ मि.ली. + पाण्यात मिसळणारे गंधक १२५० ग्रॅम ५०० लिटर पाणी / हेक्टरी मिसळून फवारणी करावी.
- पाऊस नसल्यास संरक्षित पाणी द्यावे. अथवा २ टक्के युरिया किंवा पोटॅशियम नायट्रेटची फवारणी करावी.

### तूर

- किड व रोग नियंत्रणासाठी एकात्मिक किड नियंत्रण पध्दतीचा अवलंब करावा.
- पाऊस नसल्यास पिकास संरक्षित पाणी द्यावे. किंवा फुलअवस्थेत २ टक्के युरियाची फवारणी करावी.

### भात पीक

- रासायनिक खतांचा वापर : हळव्या जातींमध्ये उरलेले ५० टक्के नत्र लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे. निमगरव्या व गरव्या जातींमध्ये लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी ४० टक्के नत्र आणि २० टक्के नत्र लागणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी द्यावे. संकरित जातींकरिता हेक्टरी उरलेले २५ टक्के नत्र लागणीनंतर २५ ते ३० दिवसांनी आणि उर्वरीत २५ टक्के नत्र लागणीनंतर ५५ ते ६० दिवसांनी द्यावे.
- पाणी व्यवस्थापन : भात पिकाच्या योग्य वाढीकरीता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी. भात पोटरी अवस्थेत – ५ ते ३० सें.मी.

### नाचणी पीक

- पिकामध्ये नांग्या असल्यास १५ ते २० दिवसांनी नांग्या भरून घ्याव्यात.
- एक कोळपणी २० ते २५ दिवसांनी करावी. आंतरमशागत : एक कोळपणी व एक खुरपणी
- एक खुरपणी ४५ ते ६० दिवसांनी करावी.
- पेरणीनंतर ३० दिवसांनी ३० किलो नत्र द्यावे.

### बाजरी

- पिकाची दोन वेळा कोळपणी व गरजेनुसार १ ते २ वेळा खुरपणी करावी. पिकास ताण पडल्यास व पाणी उपलब्ध असल्यास पिकाच्या संवेदनक्षम अवस्थेत पाणी द्यावे.

### सोयाबीन

- किड व रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास शिफारशीत प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवाडा मुलस्थानी जलसंधारण करण्यासाठी ट्रॅक्टरचलित औजाराच्या सहाय्याने २ X ६ मीटर सारे पाडणे/बैलाच्या सहाय्याने १० X १० मी. अंतरावर बांध घालावेत. जास्त उतार असल्यास ५ X ५ मी.वर सारे पाडावे.

## फळबाग व्यवस्थापन

- **डाळिंब** – फळातील रस शोषणारे पतंग कीडा व कोलोट्रीटीकम या रोगांचे नियंत्रण करावे.
- **सिताफळ** – पिठया ढेकुण नियंत्रणासाठी जैवीक व निंबोळीयुक्त किडनाशकाचा वापर करावा. किडग्रस्त व रोगट फळे काढुन नष्ट करावीत.
- **बोर** – पाने खाणाऱ्या /केसाळ अळी भुंगेरे यांचे नियंत्रण करावे. मधमाशी संवर्धन करावे.
- **अंजीर** – अंजीर पिकावरील खोडकिड व सुत्रकृमीचे नियंत्रण करावे. खोडांना गेरू पेस्ट लावावी.
- **कागदी लिंबू** – पावसाचे जादा पाणी चराद्वारे बागेच्या बाहेर काढून द्यावे.
- **आंबे** – बहाराच्या फळांची काढणी करावी.
- **सिल्ला, मावा व पाने पोखरणारी अळी :** डायमिथोएट २० मिली अथवा इमिडाक्लोप्रीड २.५ मिली/१० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी.
- **कँकर / खैऱ्या रोग :** स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम + कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाणी.

## भाजीपाला व्यवस्थापन

- खरीप कांदा पिकाचे लागवडीसाठी रानबांधणी करावी.
- कांद्याची ७ ते ८ आठवड्याची रोपे लागवडीस वापरावी.
- लागवडीचे वेळेस कांदा रोपांची मुळे किडनाशक, बुरशीनाशक व जिवाणू खतांच्या द्रावणात बुडवावे.
- लागवडीचे वेळी खत मात्रेपैकी निम्मे नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळेस द्यावी.
- खरीप मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, गवार, वेलवर्गीय भाजीपाला पिकांना खुरपणी करून नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- किड व रोग नियंत्रणाचे उपाय करावेत.
- सतत ढगाळ वातावरण असल्यास ७ ते ८ दिवसांच्या अंतराने बुरशीनाशकाची फवारणी करावी.
- पिकामध्ये पाणी साचू देऊ नये.
- रांगडा कांदा लागवडीसाठी बियाणाची पेरणी करावी.

## आले

- वेळच्या वेळी येणारी तणे खुरपणी करून काढून टाकावीत.
- टाळणी करणे : आले पीक २.५ ते ३ महिन्याचे असताना उटाळणी करावी. यामध्ये लांब दांड्याच्या खुरप्याने माती हलवली जाते. त्यामुळे मुळ्या तुटून त्याठिकाणी नवीन तंतुमय मुळे फूटतात. आले पिकास ६ व्या ते ७ व्या महिन्यात फुले येतात त्यास हुरडे बांड असे म्हणतात. उटाळणी हूरडे बांड येण्यापूर्वी करावी. हुरडे बांड फुटल्यावर या पिकाच्या पानांची वाढ थांबून फण्याची वाढ होण्यास सुरूवात होते.
- उटाळणीनंतर पाण्याचा हलका ताण द्यावा म्हणजे फुटवे चांगले फुटतात.
- जमिन चुनखडयुक्त असेल तर पाने पिवळी पडलेली व शेंडा करपलेला दिसतो यावेळी मुळांना स्फुरद उपलब्ध होत नाही व त्यासाठी स्फुरद उपलब्ध करणारे जिवाणू खत एकरी २ किलो पाण्याद्यारे द्यावे.
- रिमझीम पावसात शाकीय वाढ चांगला जोर धरु लागते. अशावेळेस पिकास जास्त खाद्य अन्न लागते. त्याच्या वाढीचे बारकाईने निरीक्षण करुन नत्राचा दुसरा हप्ता ६० किलो नत्र द्यावे.

- हेक्टरी १.५ ते २.० टन करंजी किंवा निंबोळी पेंड द्यावी.
- कंदकूज रोगापासून आले पिकाचे संरक्षण करावे. आले पिकांवरील कंदकूज हा एक प्रमुख रोग आहे. वेळीच खबरदारी न घेतल्यास या रोगामुळे ५० टक्के पर्यत नुकसान होऊ शकते. भरपूर पाऊस, भारी काळी कसदार, कमी निचरा असणारी जमीन या रोगास पोषक ठरते. हा रोग ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीमध्ये जास्त प्रमाणात दिसून येतो. प्रथम पानांच्या शेंडयावरून व कडांनी पिवळे पडून झाड खालीपर्यत वाळले जाते. खोडलगतचा जमिनीलगतचा भाग काळपट राखी पडतो. याच ठिकाणी माती बाजूस करून पाहिल्यास गड्डाही वरून काळा पडलेला व निस्तेज झालेला दसतो. या भागावर दाब दिल्यास त्यातून कुजलेले, घाण वास येणारे पाणी बाहेर येते. अशा झाडाचे खोड थोडे जरी ओढले तरी चटकन हातात येते. हा रोग प्रामुख्याने सुत्रकृमी किंवा खुरपणी करताना, आंतरमशागत करताना कंदास इजा झाल्यास त्यातून पिथीयम, फयजेरियम यासारख्या बुरशींचा गड्डयामध्ये शिरकाव होऊन कंद कुजण्यास सुरुवात होते.

## पशुसंवर्धन

- गोठयातील जमीन कोरडी राहण्यासाठी चुन्याचा प्रयोग करावा. ज्वारी किंवा गव्हाचा तुसात चुना मिसळवुन त्याचा पातळ थर अंथरल्याने गोठयातील आर्द्रता कमी होतेव गोठे स्वच्छ व कोरडे राहण्यात मदत होते.
- जनावरांचे खुर वाढले असतील तर ते कापून घ्यावेत.
- गोठयात पावसाचे पाणी जमा होवून चिखल होणार नाही याची दक्षता घ्यावी.

## अवजारे

### फुले मोल नांगर

- क्षारपड व पाणथळ जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा आणि क्षारांचा निचरा करण्यासाठी कमी खर्चात मोल निचरा पध्दती राबविण्यासाठी. मोल नांगराने मोल निचरा करण्यासाठी हेक्टरी रु. १५०० इतकाखर्च येतो.
- मोल नांगर ६० ते ७२ एच.पी. ट्रॅक्टरद्वारे ओढता येतो.
- या यंत्राद्वारे दोन मोलमध्ये ४ मिटर अंतर ठेवल्यास प्रति तासाला ०.३ हेक्टर क्षेत्र करता येते.


| | |
|---|---|
| प्रकाशक | : डॉ. शरद गडाख<br>संचालक, विस्तार शिक्षण |
| प्रमुख संपादक | : डॉ. पंडित खर्डे<br>प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र |
| सहसंपादक | : डॉ. सचिन सदाफळ<br>सहाय्यक प्राध्यापक, कृषि विस्तार व संवाद विभाग |
| डिझाईनर | : श्री. राजेंद्र जांभळे<br>श्री. सिध्दार्थ साळवे |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २३९८/२०२१